सोलापूर
तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २४ जून २०२६

आतील पानावर
पान २– कतरिना करणार 'चांदनी बार २' मधून कमबॅक?
पान ३– जॅकलिन हॉरर दुनियेत पुन्हा झळकणार
पान ४– 'कंचना ४' मध्ये 'या' लेडी सुपरस्टारची एन्ट्री!
पान ५– 'लस्ट स्टोरीज ३'मध्ये झळकणार राधिका
पान ७– 'काला हिरण'मधून 'या' अभिनेत्याची एक्झिट




# 'कल्कि २'मध्ये आलिया भटची एन्ट्री?

अभिनेत्री दीपिका पादुकोण मधल्या काळात चर्चेत होती. लेकीच्या जन्मानंतर दीपिकाला दोन बिग बजेट सिनेमांमधून बाहेर पडावं लागलं होतं. आठ तासांची शिफ्ट, जास्त मानधन या अटींमुळे तिने 'स्पिरीट' आणि 'कल्की २' हे दोन्ही सिनेमा गमावले. 'स्पिरीट'मध्ये दीपिकाच्या जागी तृप्ती डिमरीची एन्ट्री झाली. तर आता 'कल्की २'मध्ये आघाडीची अभिनेत्री आलिया भटची एन्ट्री झाल्याची चर्चा आहे. नाग अश्विन दिग्दर्शित 'कल्की'च्या पुढील पार्टमध्ये आलिया भट सामील होत असल्याची चर्चा सुरु आहे.

असं झालं तर आलिया पहिल्यांदाच प्रभाससोबत झळकणार आहे. 'आकाशवाणी' आणि 'तेलुगु चित्रालु'च्या रिपोर्टनुसार, आलिया भट नाग अश्विन यांच्या 'कल्की २'मध्ये आलिया भट मुख्य भूमिकेत दिसेल. ती सिनेमाच्या दुसऱ्या शूटिंग शेड्युल वेळीच सामील झाली होती. तिने गेल्या महिन्यात हैदराबादमध्ये पाच दिवस शूटही केलं. अद्याप याबाबत अधिकृत घोषणा झालेली नाही. यापूर्वी अशीही चर्चा झालेली की आलिया दीपिकाच्या 'सुमति' भूमिकेच्या जागी दिसेल जी 'कल्कि'ची आई आहे. मात्र आता ताज्या बातम्यांनुसार एक वेगळीच हिंट मिळाली आहे. आलियाला सिनेमात एका वेगळ्या पण महत्वाच्या भूमिकेसाठी घेतलं गेलं आहे. तर दीपिकाच्या 'सुमति'साठी साई पल्लवीचं नाव आघाडीवर आहे. सिनेमाची टीम पुढच्या फेजच्या शूटिंगच्या तयारीला लागली आहे. लवकरच बाकी शेड्युल पूर्ण केलंजाईल. पुढील वर्षाच्या अखेपर्यंत सिनेमा रिलीज करण्याचं प्लॅनिंग आहे आणि तर याचं शूटिंग पुढील महिन्याच्या एप्रिलपर्यंत संपवलं जाईल अशी शक्यता आहे. मेकर्सने मात्र अद्याप रिलीजची तारीख जाहीर केलेली नाही.

# ‘बंटवारा १९४७’चा दमदार फर्स्ट लुक समोर

बॉलिवूड अभिनेता सनी देओल आणि दिग्दर्शक राजकुमार संतोषी यांची सुपरहिट जोडी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यांच्या आगामी ‘बंटवारा १९४७’ या चित्रपटाबाबत प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. या चित्रपटाची घोषणा झाल्यापासूनच चाहत्यांमध्ये चर्चेला उधाण आलं होतं. आता चित्रपटातील प्रमुख कलाकारांचे फर्स्ट लुक पोस्टर्स प्रदर्शित करण्यात आले असून त्याला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. आमिर खान प्रॉडक्शन्सच्या बॅनरखाली तयार होत असलेल्या या चित्रपटाचे मोशन पोस्टर्स याआधीच चर्चेत आले होते. आता प्रत्येक कलाकाराचा स्वतंत्र लुक समोर आल्याने चित्रपटाविषयीची उत्सुकता आणखी वाढली आहे. या चित्रपटात ज्येष्ठ अभिनेत्री शबाना आझमी ‘दुर्गावती देवी’ उर्फ ‘माई’ या महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. त्यांच्या पोस्टरमध्ये त्या पांढर्‍या साडीत आणि अतिशय साध्या वेशात दिसत आहेत. कोणताही ग्लॅमरस लुक न ठेवता त्यांच्या चेहर्‍यावर दिसणारा संघर्ष, वेदना आणि भावनिकता या पात्राची खोली दाखवून देतात. त्यामुळे चित्रपटाची कथा अत्यंत



संवेदनशील आणि भावनिक असणार असल्याचे संकेत मिळत आहेत. चित्रपटात सनी देओल ‘सिकंदर मिर्झा’ ही भूमिका साकारत आहेत. त्यांच्या पोस्टरमध्ये ते एखाद्याचा हात धरून भावूक अवस्थेत दिसत आहेत. त्यांच्या डोळ्यांमध्ये वेदना, तर चेहर्‍यावर संघर्ष स्पष्ट दिसतो. अनेक वर्षांनंतर मोठ्या पडद्यावर पुनरागमन करणारी अभिनेत्री प्रीती झिंटा देखील या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. ती ‘हमीदा बेगम’ची भूमिका साकारणार आहे. पोस्टरमध्ये तिच्या डोक्यावर पदर असून तिच्या डोळ्यांतील भीती आणि वेदना प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहेत. तिचा हा साधा लुक सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे. सनी देओलचा मुलगा करण देओल देखील या चित्रपटात झळकणार आहे. तो ‘जावेद मिर्झा’ ही भूमिका साकारणार आहे. अभिनेता अली फजल ‘हबीब अन्वर’ या भूमिकेत दिसणार आहे. वाढलेले केस, गंभीर चेहरा आणि दमदार व्यक्तिमत्त्व यामुळे त्याचा लुकही प्रभावी वाटत आहे. तर अभिनेता अभिमन्यू सिंह यालाही या चित्रपटात महत्त्वाची भूमिका देण्यात आली आहे. ‘बंटवारा १९४७’ हा चित्रपट भारताच्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर आधारित असल्याचं सांगितलं जात आहे. त्या काळातील मानवी नातेसंबंध आणि मानवतेची ताकद दाखवण्याचा प्रयत्न चित्रपटातून केला जाणार आहे. हा चित्रपट १४ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणार आहे.



# ‘चांदनी बार २’ मधून कतरिना करणार कमबॅक?

बॉलिवूड अभिनेत्री कतरिना कैफ नुकतीच आई झाली आहे. नोव्हेंबर महिन्यात तिने मुलाला जन्म दिला. गेल्या दोन वर्षांपासून कतरिना स्क्रीनवरुन गायब आहे आणि सध्या मातृत्वाचा आनंद घेत आहे. त्यातच आता लेकाच्या जन्मानंतर ती कुटुंबाला जास्त वेळ देत आहे. दरम्यान कतरिनाच्या कमबॅकची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरु आहे. ती ओटीटी सीरिजमधून झळकणार अशी चर्चा सुरु होती. पण आता ‘चांदनी बार २’ सिनेमासाठी कतरिना कैफचं नाव समोर येत आहे. मीडिया रिपोर्टनुसार, अभिनेत्री तब्बूचा सुपरहिट सिनेमा ’चांदनी बार’चा सीक्वेल येणार आहे. अजय बहल सिनेमाचं दिग्दर्शन करणार आहे. कतरिना कैफ या सिनेमात मुख्य अभिनेत्री म्हणून दिसण्याची शक्यता आहे. तब्बूही या सिनेमाचा भाग असू शकते. यावर कतरिनाकडून अद्याप कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही. प्रोजेक्टची अधिकृत घोषणा व्हायची बाकी आहे. मात्र कतरिनाच्या कमबॅकची चर्चा वार्‍यासारखी पसरली आहे.

कतरिनाच्या टीमने तिच्या ओटीटी प्रोजेक्टची बातमी खोटी असल्याचं स्पष्ट केलं होतं. त्यामुळे ’चांदनी बार २’च्या चर्चेत नक्की किती तथ्य आहे हे लवकरच कळेल. कतरिना कैफ शेवटची ’मेरी ख्रिसमस’मध्ये दिसली होती. २०२४ साली हा सिनेमा आला होता. तसंच फरहान अख्तरच्या ’जी ले जरा’मध्येही कतरिना कैफची वर्णी लागली होती. सिनेमाचं काम अद्याप सुरु झालेले नाही. यामध्ये आलिया भट आणि प्रियंका चोप्राचाही समावेश करण्यात आला होता.

कतरिना, आलिया आणि प्रियंका या तीन मैत्रिणींवर सिनेमाची कथा आधारित होती. ’चांदनी बार’ २००१ साली आला होता जो प्रेक्षकांना प्रचंड आवडला. मधुर भांडारकर यांनी सिनेमाचं दिग्दर्शन केलं होतं. तब्बू वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या भूमिकेत होती. सिनेमाला चार राष्ट्रीय पुरस्कार मिळाले.

# ‘तनु वेड्स मनु’चा तिसरा भाग येणार!

‘तनु वेड्स मनु’ हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरला होता. त्यानंतर या चित्रपटाचा दुसरा भाग ‘तनु वेड्स मनु रिटर्न्स’ देखील प्रेक्षकांच्या प्रचंड पसंतीस उतरला. गेल्या अनेक वर्षांपासून चाहते या चित्रपटाच्या तिसऱ्या भागाची आतुरतेने वाट पाहत होते. आता लवकरच या चित्रपटाचा तिसरा भाग येणार आहे. या तिसऱ्या भागाचे नाव ‘तनु वेड्स मनुः द नेक्स्ट चॅप्टर’ असल्याचे सांगितले जात आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन मिताक्षरा कुमार करणार आहेत. या प्रोजेक्टची निर्मिती ‘रुद्रक सोमा ज्योती लिमिटेड’च्या सहकार्याने केली जाणार आहे. निर्मात्यांनी अद्याप शूटिंगचे वेळापत्रक जाहीर केले नसले, तरी पुढील वर्षात या चित्रपटाचे शूटिंग सुरू होईल अशी अपेक्षा आहे. ‘तनु’ आणि ‘मनु’च्या भूमिकेत पुन्हा एकदा कंगना आणि आर. माधवन परतणार आहेत. त्यांच्या ऑन-स्क्रीन केमिस्ट्रीमुळेच पहिल्या दोन्ही चित्रपटांना अभूतपूर्व यश मिळाले होते. या दोन्ही पात्रांनी आधुनिक हिंदी रोमँटिक-कॉमेडी चित्रपटात एक वेगळीच जागा निर्माण केली. दरम्यान, या चित्रपटाच्या कथेबाबत निर्मात्यांनी सध्या कोणतीही माहिती दिलेली नाही, परंतु कंगनाच्या भूमिकेवरून आतापासूनच तर्कवितर्क लावले जात आहेत. ‘तनु वेड्स मनु रिटर्न्स’मध्ये कंगनाने तनु आणि कुसुम सांगवान (दत्तो) अशी दुहेरी भूमिका साकारली होती. आता तिसऱ्या भागात कंगना एकापेक्षा जास्त भूमिकांमध्ये दिसणार का, याबद्दल उत्सुकता आहे. ‘तनु वेड्स मनु’ या चित्रपटाने कंगना आणि आर. माधवन यांना बॉलिवूडमधील सर्वात लोकप्रिय ऑन-स्क्रीन जोड्यांपैकी एक बनवले. कंगनाने ‘ तनू वेड्स मनू’, ‘रिव्हॉल्वर रानी’, ‘उंगली’, ‘कट्टी बट्टी’, ‘रंगून’, ‘सिमरन’, ‘मणिकर्णिकाः झाँसी की रानी’, ‘जजमेंटल है क्या’, ‘पंगा’, ‘थलायवी’, ‘धाकड’, ‘चंद्रमुखी २’ आणि ‘तेजस’ यांसारख्या गाजलेल्या चित्रपटांमधून तिने प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. सध्या अभिनेत्री तिच्या आगामी ‘भारत भाग्य विधाता’ या चित्रपटामुळे प्रचंड चर्चेत आहे.

# लगानने माझं करिअर उद्ध्वस्त केलं



'लगान' या सुपरहिट चित्रपटाने भारतीय चित्रपटसृष्टीत इतिहास रचला. या चित्रपटाने अनेक कलाकारांना लोकप्रियता मिळवून दिली. नुकतेच या चित्रपटाला २५ वर्ष पूर्ण झाले असून, या निमित्ताने चित्रपटातील कलाकार एकत्र आल्याचे पाहायला मिळाले. यावेळी अनेकांनी आपल्या आठवणी शेअर केल्या. लगानमध्ये 'बाघा' ही संस्मरणीय भूमिका साकारणारे अभिनेते अमीन हाजी यांनी २५ वर्षांनंतर धक्कादायक खुलासा केला आहे. अमीन हाजी यांनी एका मुलाखतीत सांगितले की, 'लगान'मधील भूमिका त्यांच्या अभिनय कारकिर्दीसाठी एक उच्च मापदंड ठरली. चित्रपटातील कथा आणि पात्रांची ताकद इतकी प्रभावी होती की त्यानंतर मिळालेल्या अनेक भूमिका त्यांना समाधानकारक वाटल्या नाहीत. लगान'नंतर माझ्याकडे आलेल्या कोणत्याही भूमिका त्या दर्जाच्या नव्हत्या. या चित्रपटाने अभिनेता म्हणून माझ्या अपेक्षा खूप उंचावल्या. 'लगान'ने मला व्यावसायिकदृष्ट्या उद्ध्वस्त केलं, असे अमीन हाजी म्हणाले.

२००१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'लगान' मध्ये अमीन यांनी 'बाघा' ही भूमिका साकारली होती. बोलू आणि ऐकू न शकणारा हा गावकरी आपल्या बुद्धिमत्तेमुळे आणि समजूतदारपणामुळे भुवनच्या क्रिकेट संघाचा महत्त्वाचा सदस्य ठरतो.

आजही 'बाघा' हे पात्र चित्रपटप्रेमींच्या स्मरणात कायम आहे. या भूमिकेसाठी अमीन यांनी विशेष मेहनत घेतली होती. कर्णबधिर आणि मुक्या व्यक्तींच्या कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांनी त्यांच्या हालचाली, देहबोली आणि भावना समजून घेण्याचा प्रयत्न केला होता, जेणेकरून पात्र अधिक वास्तववादी वाटेल. 'लगान'ने अमीन यांच्या वैयक्तिक आयुष्यालाही नवे वळण दिले. चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान त्यांची ओळख ब्रिटिश मानव वंशशास्त्रज्ञ शार्लट व्हिटबी-कोल्स यांच्याशी झाली. पुढे या मैत्रीचे प्रेमात रूपांतर झाले आणि दोघांनी विवाह केला. अभिनयासोबतच अमीन हाजी यांनी लेखन आणि दिग्दर्शन क्षेत्रातही आपली छाप सोडली. 'स्वदेस' आणि 'जोधा अकबर' यांसारख्या चित्रपटांच्या लेखनात त्यांनी योगदान दिले, तर 'कोई जाने ना' या चित्रपटाद्वारे दिग्दर्शक म्हणूनही पदार्पण केले. तरीही, आजही त्यांची ओळख 'लगान'मधील 'बाघा' या भूमिकेमुळेच सर्वाधिक आहे.

त्यांच्या मते, ही भूमिका इतकी प्रभावी ठरली की त्यानंतर तशा ताकदीचे पात्र पुन्हा मिळणे कठीण झाले.

# 'प्रीतम अँड पेड्रो'ची जोडी 'या' सिनेमात



दिग्दर्शक राजकुमार हिरानी आता ओटीटी विश्वात पदार्पण करत आहेत. अविनाश अरुण दिग्दर्शित 'प्रीतम अँड पेड्रो' या आगामी वेबसीरिजची त्यांनी निर्मिती केली आहे. या सीरिजचा ट्रेलर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीस आला असून, त्याने प्रेक्षकांची उत्सुकता कमालीची वाढवली आहे. या सीरिजमध्ये सस्पेन्स, कॉमेडी आणि ड्रामाचे असे सर्व एकत्र पाहायला मिळणार आहे. ट्रेलर लॉन्चच्या वेळी राजकुमार हिरानी यांनी सांगितले की, 'प्रीतम अँड पेड्रो'ची कथा सर्वात जास्त यासाठी आवडली, कारण यात दोन पूर्णपणे वेगवेगळ्या विचारसरणीच्या पात्रांमधील नाते अतिशय खास पद्धतीने दाखवण्यात आले आहे. या सीरिजची कथा गोव्याच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे. कथेत एका बाजूला प्रीतम (वीर हिरानी) आहे, जो पूर्णपणे नवीन तंत्रज्ञानावर अवलंबून आहे. प्रीतम हा जेनझी युगातला हॅकर आहे. तर दुसऱ्या बाजूला पेड्रो (अर्शद वारसी) क्राइम ब्रांच पोलिस अधिकारी आहे. जो जुन्या पद्धतीने काम करणारा आहे. या दोघांचे विचार आणि काम करण्याच्या पद्धतीत खूप फरक आहे.

पेड्रोची अचानक क्राइम ब्रांचमधून सायबर क्राइममध्ये बदली होते. तेव्हा प्रीतम आणि पेड्रो एक केस सोडवण्यासाठी एकत्र येतात आणि इथूनच खरा खेळ सुरू होतो. या सीरिजची निर्मिती राजकुमार हिरानी यांनी केली असून, याचे दिग्दर्शन अविनाश अरुण यांनी केले आहे. सीरिजमध्ये अर्शद वारसी, विक्रांत मॅसी, वीर हिरानी, मोना सिंग आणि बोमन इराणी यांसारखे दमदार कलाकार मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. विक्रांत मेस्सी सीरिजमध्ये खलनायकाच्या भूमिकेत आहे. या चित्रपटाचा ट्रेलर अनेकांच्या पसंतीस पडला आहे. राजकुमार हिरानी यांची ही बहुप्रतीक्षित सीरिज ३ जुलै रोजी जिओ हॉटस्टारवर रिलीज होणार आहे.

# जॅकलिन हॉरर दुनियेत पुन्हा झळकणार



बॉलिवूड अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिस लवकरच एका नव्या हॉरर चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. गेल्या काही वर्षांत हॉरर चित्रपटांची लोकप्रियता मोठ्या प्रमाणात वाढली असून प्रेक्षकांकडून या प्रकारच्या चित्रपटांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. अशा परिस्थितीत जॅकलिनचा हा नवा प्रकल्प सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. जॅकलिन यापूर्वीही हॉरर-कॉमेडी प्रकारातील 'भूत पोलीस' आणि ब्रिटिश चित्रपट 'डेफिनिशन ऑफ फिअर'मध्ये झळकली होती. मात्र, यावेळी ती पूर्णपणे हॉरर चित्रपटाचा भाग असणार आहे. वृत्तानुसार, जॅकलिन गेल्या अनेक दिवसांपासून अशा एका वेगळ्या आणि दमदार कथानकाच्या शोधात होती, ज्यामुळे तिला हॉरर शैलीत काहीतरी नवीन करण्याची संधी मिळेल. या चित्रपटाची कथा तिला खूप आवडल्याचं सांगितलं जात आहे. विशेष म्हणजे हा चित्रपट फक्त प्रेक्षकांना घाबरवण्यापुरता मर्यादित राहणार नाही. त्यामध्ये भावनिक कथा, रहस्य आणि दमदार संगीताचाही समावेश असणार आहे. त्यामुळे हा चित्रपट प्रेक्षकांना एक वेगळाच अनुभव देऊ शकतो. सध्या या चित्रपटाचं अधिकृत नाव जाहीर करण्यात आलेलं नाही. मात्र, या चित्रपटात जॅकलिनसोबत आणखी दोन प्रमुख पुरुष कलाकार दिसणार असल्याची माहिती आहे. या कलाकारांची निवड जवळपास पूर्ण झाली असली तरी त्यांच्या नावांची घोषणा अद्याप करण्यात आलेली नाही. या चित्रपटाची निर्मिती ख्याती मदान करत आहेत. मात्र, चित्रपटाचं दिग्दर्शन कोण करणार आणि इतर कलाकार कोण असतील, याबाबत निर्मात्यांनी कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. या चित्रपटाबाबत आणखी एक विशेष बाब म्हणजे मुख्य चित्रीकरण सुरू होण्यापूर्वीच चित्रपटाचा टीझर शूट करण्यात आला आहे. त्याचबरोबर चित्रपटातील एक गाणंही चित्रित करण्यात आलं आहे.

दरम्यान, जॅकलिन तिच्या आगामी 'वेलकम टू द जंगल' या मल्टिस्टारर चित्रपटामुळेही चर्चेत आहे. हा लोकप्रिय 'वेलकम' फ्रँचायझीचा तिसरा भाग आहे. या चित्रपटात अक्षय कुमार, सुनील शेट्टी, रवीना टंडन, दिशा पटानी यांच्यासह अनेक कलाकार झळकणार आहेत. दिग्दर्शक अहमद खान यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेला हा चित्रपट २६ जून रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. एकीकडे कॉमेडी आणि मनोरंजनाने भरलेला 'वेलकम टू द जंगल' आणि दुसरीकडे रहस्य, भीती आणि भावनिक कथानक असलेला नवा हॉरर चित्रपट अशा दोन वेगवेगळ्या शैलीतील प्रकल्पांमुळे जॅकलिन पुन्हा एकदा प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेत आहे. आता तिच्या नव्या हॉरर चित्रपटाचं नाव आणि कलाकारांची अधिकृत घोषणा कधी होणार, याकडे चाहत्यांचं लक्ष लागलं आहे.

# चिरंजीवीच्या १५८ व्या चित्रपटाचे काम सुरू



अभिनेता चिरंजीवी यांच्या आगामी चित्रपटाबद्दल प्रेक्षक उत्सुक आहेत. हा मेगास्टारचा १५८ वा चित्रपट असून, त्यामुळे त्याचे तात्पुरते नाव 'मेगा १५८' असे ठेवण्यात आले आहे. या बहुप्रतिक्षित चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात झाली आहे. चित्रपटाचा मुहूर्त सोहळा विशेष होता, कारण चिरंजीवी यांचे धाकटे बंधू आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री आणि अभिनेते पवन कल्याण हे त्यांचे मोठे भाऊ चिरंजीवी यांच्या खूप जवळचे आहेत. दोन्ही भावांमध्ये एक घट्ट भावनिक नाते आहे. आता, जेव्हा चिरंजीवी यांच्या आगामी चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात झाली, तेव्हा पवन कल्याण स्वतः मुहूर्ताच्या शॉटसाठी टाळी वाजवायला आले, ज्यामुळे तो क्षण खूप खास बनला. चिरंजीवी यांनी शूटिंगच्या पहिल्या दिवसाचे काही फोटो शेअर केले आणि पवन कल्याण यांचे आभार मानले. त्यांनी हे फोटो त्यांच्या माजी प्रियकराच्या अकाउंटवरून शेअर केले. त्यांनी लिहिले, आज, जेव्हा मी कल्याण बाबू आणि माझ्यातील तो क्लॅप पाहतो, तेव्हा मला ३० वर्षांपूर्वीचा तो सीन आठवतो- 'अक्कडा अम्मायी इक्कडा अब्बायी'. आज, उपमुख्यमंत्री म्हणून, माझ्या १५८ व्या चित्रपटाच्या मुहूर्ताला उपस्थित राहून, टाळ्या वाजवून आणि युनिटमधील सर्व सदस्यांना आनंदित केल्याबद्दल धन्यवाद. चिरंजीवी यांनी त्यांच्या कॅप्शनमध्ये उल्लेख केलेले 'अक्कडा अम्मायी इक्कडा अब्बायी' हे शीर्षक वास्तविकतः पवन कल्याणच्या पदार्पणाच्या चित्रपटाचे नाव आहे. पवनचा मोठा भाऊ, सुपरस्टार चिरंजीवी यांनी चित्रपटाच्या सेटवर मुहूर्ताचा शॉट घेतला होता.



# मल्याळम सिनेसृष्टीत करण जोहर दिसणार

करण जोहर हा बॉलिवूडमधील नावाजलेला दिग्दर्शक आणि निर्माता आहे. कुछ कुछ होता है', कभी खुशी कभी गम ते स्टुडंट ऑफ द इयर अशा अनेक रोमँटिक चित्रपटांचं दिग्दर्शन त्याने केलं आहे. एकीकडे बॉलिवूडमध्ये नाव कमावल्यानंतर करण जोहरने आता मल्याळम सिनेसृष्टीकडे आपला मोर्चा वळवला आहे. बॉलिवूडनंतर करण जोहर आता दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत पदार्पण करत आहे.

नुकतीच करण जोहरच्या आगामी 'ओडियन' या मल्याळम चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. शिवाय या चित्रपटाचं पहिलं पोस्टर देखील समोर आलं आहे. ज्यामुळे सिनेरसिकांची मोठी उत्सुकता वाढली आहे. दरम्यान, 'ओडियन- द एज ऑफ इल्यूजन' या चित्रपटाची निर्मिती करण जोहरच्या धर्मा प्रॉडक्शन्स बॅनरखाली होणार आहे. या चित्रपटाद्वारे निर्माता करण जोहर मल्याळम चित्रपटसृष्टीत पदार्पण करत आहे. 'ओडियन' मध्ये पृथ्वीराज सुकुमारन तसंच अभिनेत्री मंजू वारियक मुख्य भूमिकेत दिसणार आहे. तसंच या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा राहुल सदाशिवन यांच्या खांद्यावर आहे. या चित्रपटात पृथ्वीराजसोबत मंजू वॉरियर एका महत्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहे. करण जोहरने आपल्या अधिकृत सोशल मिडिया अकाउंटवर या चित्रपटाचं पोस्टर शेअर करत म्हटलंय, धर्मा मुव्हीज आता मल्याळम चित्रपटसृष्टीत पहिलं पाऊल टाकत आहे. आणि मला हे जाहीर करताना अभिमान वाटतो की यासाठी आम्हाला सर्वोत्तम भागीदार मिळाले आहेत, असे जोहरने लिहिले. त्यानंतर करण जोहरने पुढे लिहिलंय, पृथ्वीराज, आपण अनेक प्रकल्पांवर एकत्र काम केले आहे आणि भविष्यातही अशा अनेक प्रोजेक्ट्समध्ये काम करू अशी आशा आहे. अत्यंत प्रतिभावान राहुल सदाशिवन दिग्दर्शित आमच्या 'ओडियन' या चित्रपटाची घोषणा करताना आम्हाला अभिमान वाटतो. लोककथांवर आधारित हॉरर चित्रपटाची कथा प्रेक्षकांसमोर मांडणं ही एक उल्लेखनीय गोष्ट आहे. या कथांना पडद्यावर जिवंत करणारी आहे अप्रतिम मंजू वॉरियर आणि आपला लाडका पृथ्वीराज. अशा आशयाची पोस्ट करणने शेअर केली आहे.



# 'कंचना ४' मध्ये 'या' लेडी सुपरस्टारची एन्ट्री!

अलिकडच्या काळात चित्रपटसृष्टीत हॉरर-कॉमेडी चित्रपटांची लोकप्रियता वाढत आहे. विशेषतः थिएटर असो किंवा ओटीटी हल्ली या जॉनरचे चित्रपट पाहण्याकडे प्रेक्षकांचा कल वाढत चालला आहे. दरम्यान, २०११ मध्ये प्रदर्शित झालेला 'कंचना' हा सिनेमा सुपरहिट ठरला. त्याच्या लोकप्रियतेमुळे या सिनेमाचे 'कंचना २' आणि 'कंचना ३' असे भागही प्रदर्शित करण्यात आले. सिनेमात राघव लॉरेन्सनेच मुख्य भुमिका साकारली होती. या सिनेमात अभिनयासह दिग्दर्शनही त्यानेच केले होते. सिनेमाने बॉक्स ऑफिसवरही भरघोस कमाई केली होती. या सिनेमानं प्रेक्षकांच्या मनावर मोहिनी घातली. त्यात आता लवकरच कंचना या फ्रँचायझीचा चौथा भाग प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अशातच या चित्रपटाबाबत एक महत्वाची अपडेट समोर आली आहे.

कंचना ४ मध्ये अभिनेता राघव लॉरेन्स मुख्य भूमिका साकारणार आहे. मात्र, मुख्य अभिनेत्रीच्या भूमिकेबाबत प्रेक्षकांना ट्विस्ट पाहायला मिळणार आहे. याआधी चित्रपटात पूजा हेगडे तसेच नोरा फतेही यांची वर्णी लागल्याच्या चर्चा होत्या. परंतु, आता या चित्रपटात आणखी एका लेडी सुपरस्टारची एन्ट्री झाल्याचं बोललं जात आहे. राघव लॉरेन्सच्या कंचना फ्रँचायझीच्या चौथ्या भागात पूजा हेगडे आणि नोरा फतेही यांची दिसणार असल्याच्या चर्चा आहेत. कंचना ४ मधून नोरा फतेही तमिळ चित्रपटसृष्टीत पदार्पण करत आहे. आता या प्रोजेक्टसोबत दाक्षिणात्य अभिनेत्री नयनताराचं नाव जोडलं जात आहे. रिपोर्टनुसार, नयनतारा 'कांचना ४' मध्ये दिसणार असल्याची शक्यता आहे. त्यामुळे या चित्रपटात प्रेक्षकांना एक वेगळाच ट्विस्ट पाहायला मिळणार आहे. दरम्यान, या चित्रपटात नयनताराची भूमिका नेमकी कशी असणार, ही माहिती अद्याप गुलदस्त्यात आहे. मात्र, अजूनही नयनतारा किंवा निर्मात्यांनी या बातम्यांना दुजोरा दिलेला नाही. २०११ मध्ये राघव लॉरेन्सच्या 'कंचना' या फ्रँचायझीचा पहिला भाग प्रदर्शित झाला. जवळपास १५ वर्षांपूर्वी आलेला हा हॉरर थ्रिलर प्रचंड गाजला होता. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवरही यशस्वी ठरला होता. २०१५ मध्ये याचा सिक्वेल प्रदर्शित झाला, त्यानंतर २०१९ मध्ये या फ्रँचायझीमधील तिसरा चित्रपट आला आणि आता चौथा चित्रपट लवकरच येणार आहे. मात्र, प्रदर्शनाची तारीख जाहीर करण्यात आलेली नाही.

# 'देऊळबंद २'साठी केली शाहरूखने मदत

'देऊळबंद २' सिनेमा सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालतोय. या सिनेमाचा गेल्या महिन्याभराचा बॉक्स ऑफिसवरील प्रवास पाहता लवकरच 'देऊळबंद २' हा शंभर कोटींच्या क्लबमध्ये एन्ट्री घेईल असा अंदाज व्यक्त केला जात आहे. या चित्रपटाला भरभरून यश मिळाल्यावर सर्वत्र प्रवीण तरडे आणि टीमचं कौतुक करण्यात येत आहे. पण, सिनेमा रिलीज होण्यापूर्वी परिस्थिती पूर्णपणे वेगळी होती.

'देऊळबंद २'साठी तरडेंकडे पैसे नव्हते या कठीण परिस्थितीत शाहरुख खानसह त्याच्या रेड चिलीज कंपनीने साथ दिल्याचं, प्रवीण तरडेंनी एका मुलाखतीत सांगितलं. प्रवीण तरडे सांगतात, देऊळबंद २' सिनेमाचा DCP काढायचा होता. पण आमच्याकडे पैसे नव्हते. तेव्हा शाहरुख खानसह त्यांच्या रेड चिलीज कंपनीने खूप मोठी मदत केली. आमचं बजेट होतं १२ लाखांचं पण, ते सगळं बिल एकूण ४२ लाखांचं झालं. आता एवढे पैसे कुठून आणणार? त्यानंतर मग आम्ही 'रेड चिलीज'ला विनंती केली होती की, मराठी सिनेमा आहे इतकं बजेट नाहीये. आम्हाला हा सिनेमा खूप भारी दाखवायचा होता म्हणून आम्ही तुमची मदत मागतोय. प्रवीण पुढे म्हणाले, ही बातमी शाहरुखपर्यंत पोहोचली. त्यांनी मग रेड चिलीजची तांत्रिक बाजू सांभाळणाऱ्यांना नेमकं काय झालंय वगैरे विचारलं. शाहरुखच्या टीमने त्यांना सांगितलं, सर 'मुळशी पॅटर्न'वाल्याचा चित्रपट आहे. आता भाईजानने आधीच 'अंतिम' सिनेमा रिमेक केल्यामुळे शाहरुखला 'मुळशी पॅटर्न' चित्रपट माहीत होता. मग त्यांनी टीमला विचारलं, हा नवीन चित्रपट कसा बनवलाय? त्यांच्या टीमने सांगितलं, खूप छान सिनेमा तयार केलाय, भावनिक सिनेमा आहे आणि आता ऊउझ द्यायचीये. पण, त्यांच्याकडे पैसे नाहीयेत. पूर्ण पैसे दिल्याशिवाय DCP देत नाहीत हा नियम आहे. शाहरुखने कसलाही विचार न करता सांगितलं तुम्ही त्यांना ऊउझ देऊन टाका. 'उनका बिल माफ करो' चित्रपट चांगलाय, मग DCP देऊन टाका. रेड चिलीजने ४० ते ४५ टक्के बिल माफ केलं. मराठी सिनेमासाठी त्यांनी जे पाऊल उचललं, इतकी मोठी मदत केलीत्यामुळे शाहरुख खान आणि त्यांच्या संपूर्ण टीमचं मला खूप कौतुक आहे. पैसे सोडा चित्रपट महत्त्वाचा हा त्यांचा विचार होता हे आजच्या जगात किती महत्त्वाचं आहे. आता शाहरुखला हा सिनेमा दाखवायला मला खूप आवडेल. आता आमच्या सिनेम ला बॉक्स ऑफिसवर खूप यश मिळालं. कदाचित आता चित्रपट १०० कोटींची कमाई सुद्धा करेल तेव्हा सगळेजण कौतुक करतील. पण, जेव्हा काहीच नव्हतं तेव्हा शाहरुखने केलेली मदत न विसरता येणारी आहे.



# दुनियादारीनंतर मी हवेत होतो

'दुनियादारी' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला होता. संजय जाधव दिग्दर्शित या चित्रपटाला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. अंकुश चौधरी, स्वप्नील जोशी, सई ताम्हणकर, उर्मिला कोठारे, जितेंद्र जोशी यांनी प्रमुख भूमिका साकारल्या होत्या. 'दुनियादारी' चित्रपटाचा दुसरा भाग येणार का याची आजही प्रेक्षकांना उत्सुकता लागली आहे, मात्र याबाबत दिग्दर्शक संजय जाधव यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. प्रेक्षकांना आता माझ्या कामावर विश्वास राहिलेला नाही, अशी खंत व्यक्त केली आहे. दिग्दर्शक संजय जाधव यांनी मुलाखतीत म्हणाले की, माझे पहिले प्रेम सिनेमेटोग्राफी आहे. अपघाताने मी दिग्दर्शक झालो. कॅमेरा माझी आवड आहे, ते माझ्या रक्तात आहे. दिग्दर्शक म्हणून 'दुनियादारी' माझा पहिलाच चित्रपट होता. मी अगदी सहज दुनियादारी कादंबरीवर काम केले. 'दुनियादारी' करताना असे कधी वाटले नाही की तो एवढा लोकप्रिय होईल. यश मिळाल्यानंतर लोकांच्या आपल्याकडे पाहण्याच्या नजरा बदलतात, आपला विचार बदलतो. दुनियादारीच्या यशानंतर मी हवेमध्ये होतो. पुढे ते म्हणाले की, पुढचा कितीतरी काळ मी दुनियादारीच्या यशानंतर हवेमध्ये राहिलो होतो. मी लोकांशी नीट बोलतोय असे मला वाटायचे, पण तसे नव्हते. त्यावेळी मी अनेकांना माझ्या बोलण्यातून वागण्यातून दुखावले. 'प्यार वाली लव्ह स्टोरी' चित्रपट फ्लॉप होईपर्यंत मी असाच हवेमध्ये होतो, असे संजय जाधव म्हणाले आहेत. पुढे ते म्हणाले, दुनियादारी २ करणे मला झेपणार नाही. 'दुनियादारी २' हा प्रोजेक्ट खूप वेळा सुरू होऊन बंद झाला आहे, त्यामुळे आता असे वाटते की सुहास शिरवळकरसुद्धा वरून सांगत आहेत की नको करू; त्या संकेतांचा आपण मान ठेवला पाहिजे. लॉकडाऊनमुळे प्रोजेक्ट थांबला आणि नंतरसुद्धा खूप वेळा काम थांबले. आता माझ्यावर आणि माझ्या स्क्रिप्टवर लोकांचा विश्वासच राहिला नाही. त्यामुळे मला आता करायचेच नाही असे स्पष्ट मत जाधव यांनी व्यक्त केले आहे.



# 'लस्ट स्टोरीज ३'मध्ये झळकणार राधिका

राधिका मदान 'सूबेदार' या चित्रपटातील स्वत:च्या प्रभावी अभिनयामुळे सध्या कौतुकाची धनी ठरली आहे. आता राधिका ही शकुन बत्रा यांच्या 'लस्ट स्टोरीज ३'साठी पूर्णपणे तयार असून यात ती अली फजलसोबत दिसून येणार आहे.

शकुन बत्रा यांच्या कामाची मी अत्यंत मोठी चाहती राहिली आहे. त्यांच्या चित्रपटाविषयी कळल्यावर मी 'लस्ट स्टोरीज ३'साठी ऑडिशन देण्याची विनंती केली. देवाच्या कृपेमुळे मला ही संधी मिळाली. मी एक सरासरी अभिनय करण्याची जोखीम पत्करू शकत नाही. प्रत्येक भूमिकेसाठी अनेक लोक रांगेत उभे असतात. जर मी चांगला अभिनय सादर न केल्यास मला पुणीच दुसरी संधी देणार नाही. माझ्यासाठी प्रत्येक काम 'करो या मरो'सारखे असते. या क्षेत्रात टिकायचे असल्यास मला दरवेळी सर्वोत्तम द्यावे लागणार असल्याचे उद्गार राधिकाने काढले आहेत. ऑडिशनसाठी मी रांगेत उभी राहिली आहे, अत्यंत मेहनत केली आहे. लोक मला कास्ट करण्याविषयी विचार करत नसल्यास मी स्वत: ऑडिशन मागते आणि यात मला कुठलाच कमीपणा वाटत नाही. ऑडिशनची संधीच न मिळाल्यास आणि केवळ माझ्या आडनावामुळे मला नाकारण्यात आल्यास त्रास होतो. जर मी ऑडिशन देऊन रिजेक्ट झाली तर वाईट वाटत नाही. याकरता मला पुन्हा रांगेत उभे रहावे लागले तरीही माझी तयारी आहे. मी एक कलाकार आहे आणि स्वत:च्या स्वप्नांसाठी काहीही करण्यास तयार असल्याचे राधिकाचे सांगणे आहे.



# आयेगा... आयेगा आनेवाला...! संगीतकार खेमचंद प्रकाश

**द मरने की दुवाए क्यों मांगू।।** जिनेकी तमन्ना कोन चित्रपटसृष्टीत गायक म्हणून प्रयत्नशील असणारे किशोरकुमार यांच्याही स्वरातील वैशिष्ट्य खेमचंद यांच्या पारंगत व संवेदनशील नजरेने टिपले. वरील गाण्याने हे सिद्ध केले. जो आग लगायी थी तुमने। उसको तो बुझाया अश्कोने। जो अश्कोने भडकायी है। उस आग को थंडा कौन करे...' किशोरकुमारच्या कंठातून आसावरीचे स्वर हुडकून काढून 'जिद्दी' चित्रपटातील गझल स्वरूप गाण्याद्वारे किशोर यांच्या कलाजीवनाचा अध्याय खेमचंद यांच्या कौशल्याने सुरू झाला. आयेगा आयेगा आयेगा.. आयेगा आनेवाला...'



**चंदा रे जारे जा रे। पिया को संदेशा मेरा कहीयो जा... जंगलाच्या जाळीतून व डोंगराच्या घळीतून पाझरणारा तत्कालीन स्वरकोकिळेच्या कोवळ्या स्वरावर सांगीतिक नक्षीकाम करून खेमचंद प्रकाश या संगीतकाराने या छायानाट रागावर आधारित १९४८ सालच्या 'जिद्दी' चित्रपटाद्वारे संगीत प्रवास सुरू केला. सुरुवातीस संथ लयीत 'चंदारे जारे जा रे'चे आवर्तन नंतर तीच ओळ किंचित द्रुतात म्हणून, त्याच लयीत पिया को संदेशा...'चे स्वर, त्यानंतर द्रुत विलंबित स्वरात मेरा तुम बिन जिया...' ऐकताना कानाला गुदगुल्या होतात. इथेच संगीतकाराचे कसब लक्षात येते.**

१९४१ च्या 'महल' चित्रपटातील या गूढ दार्शनिक गीताद्वारे खेमचंद प्रकाश यांनी सिनेसंगीतात क्रांती घडविली. पडद्यावरील गूढ प्रसंगाला लता यांच्या स्वरातील चढउतार व चपखल पार्श्वसंगीताद्वारे अभिनव प्रयोग करून लता यांची ओळख ठरलेले हे अजरामर गूढ गीत जन्मास घातले. संगीतकाराची करामत, वाद्यांचा मेळ बसवून, संथ लयीतील लता यांच्या सुरुवातीच्या स्वरानेच सस्पेन्स प्रकट होतो. आर्त सुरातील आर्ततेने खामोश है जमाना..' हे स्वर सहज कानाला चाटून जातात. चुपचाप है...सितारे'मधला 'सितारे' जरा लांबवून म्हटल्याने सस्पेन्स अजून गहेरा होतो. धरुपदाच्या आधीच्या आठ ओळीत पहिला शब्द संथ व शेवटला थोडा लांबवून म्हटला आहे. ऐकणारा रसिक गोड विस्मयात रमतो. एवढी सांगीतिक मेजवानी मिळाल्यावर आयेगा...' हे धृपद सुरू होते. नंतर कडवे. परमेश्वराने पृथ्वीवर निर्माण केलेला गाणहिराचं आहे; पण या हिऱ्याच्या स्वरावर इतकी मेहनत करून प्रत्येक पैलूची जाण दर्शकाला देणे, हे काम खेमचंद प्रकाशच करू शकले. स्वातंत्र्यपूर्व काळात पंजाबी व बंगाली गायिकांचे वर्चस्व असताना लताच्या कोकिळ कंठाचा शोध लागला तो दिग्गज संगीतकार गुलाम हैदर व खेमचंद प्रकाश यांना स्त्री गायिकेत लता मंगेशकर या नवीन युगाच्या प्रवर्तक ठरल्या. स्वातंत्र्यपूर्व काळातील खेमचंद यांच्या श्रवणीय संगीत कारकीर्दीचा समाचार घेऊ...

कभी नेकी भी उसके जीमे गर आ जाये है मुश्किल, जफाए करके अपनी याद करना जाये है मुशकिल'... स्वतंत्र संगीतकार म्हणून १९३९ सालच्या पहिल्या 'गाजी सलाउद्दीन' चित्रपटात सर्व प्रथम मिर्झा गालिब यांची प्रसिद्ध गझल कल्याणी नावाच्या गायिकेकडून खूबसूरत अंदाजात गाऊन घेण्याचा नवीन प्रयोग केला.

आशा सुख के खेल खिलाये। भोलेभाले मनको जीवन दे...' १९३९ सालच्या 'मेरी आंखे' चित्रपटातील गाण्यात धृपदानंतर तत्कालीन गायिका खुर्शीद बानो यांच्या कोमल, लडीवाळ कंठातून निघालेले सुस्वर बासरीच्या तरंगावर प्रवाहित केले. नंतरच्या अंतऱ्यातील सहज सुंदर वीण तबला ढोलकी सतार व संवादिनी, वाद्यांनी विणली. या चित्रपटातील यशाने निर्मात्यांची लाईन लागली. भिगोरी मोरी सारी रे...'

१९४१ च्या शादी' चित्रपटातील या गाण्यात खुर्शीद यांचा मधाळ स्वर, दैवी लावण्य व खेमचंद यांच्या मधुर संगीताचा अद्भुत मिलाफ आहे. हे अप्रतिम गाणे त्या काळात खूप गाजले. मोरे अंगणा मे अंबुवा की डाली.

(२) जवानी मे आके दुनिया... १९४१ सालच्या परदेसी' चित्रपटातील गाण्यांनी खुर्शीद या गायिकेला यशाच्या शिखरावर नेवून ठेवले. तब्बल सात गाणी खुर्शीद यांच्याकडून गाऊन घेतलीत. त्यातही वरील दोन गाण्यांनी रेकॉर्ड प्रस्थापित केला होता. चित्रपट क्षेत्रात रंजन क्षमतेची गायकीच आवश्यक ठरेल हे भाकीत त्या काळात खेमचंद यांनी केले होते. पहले जो मोहोब्बत से इन्कार किया होता... वरील चित्रपटातील या गाण्यात खुर्शीद यांच्या स्वरातून कव्वालीचा खूबसूरत बाज द्रुतात प्रदर्शित करून त्यांच्या गायकीला वेगळा मोड दिला. तशी पहिली स्वतंत्र कव्वाली १९४५ सालच्या 'झिनत' चित्रपटात होती. सप्त सूर तीन ग्राम। गावो सब गुण निजन...'

१९४३ च्या 'तानसेन' चित्रपटात युगप्रवर्तक गायक कुंदनलाल सैगल यांच्या स्वर्गीय स्वर लहरीबरोबर हे गाणे हिंदोळे घेते. गांधार, ताण, मध्यम, पंचम, धैवत इ. तांत्रिक करामतीच्या गाण्यातील वर्णनाद्वारे तानसेन यांनी कल्याण रागातील या गाण्यातून शास्त्रीय संगीताचे ऐश्वर्य राजदरबारी प्रकट केले. तानसेन हा चित्रपट सैगल यांचे स्वर व खेमचंद यांच्या संगीताने. त्या काळात खूप गाजला. हिंदी बोलपटाच्या सुरुवातीच्या कालखंडात कुंदनलाल सैगल हे सर्वश्रेष्ठ गायक होते. त्यांच्या चित्रपटाला संगीत देणारे संगीतकारही महान होते. राजस्थानी लोकसंगीताचा बाज वापरून संगीत क्षेत्र समृद्ध करणारे खेमचंद प्रकाश आज फारच थोड्यांना माहिती असतील. १९३५ ते १९५० पर्यंत त्यांचा कालखंड सक्रिय होता. त्यांनी ४३ हिंदी चित्रपटांना संगीत दिले.

१२ डिसेंबर १९०७ साली राजस्थानमधील सुजाणगड येथे त्यांचा जन्म झाला. वडील गोवर्धन प्रकाश संगीताचे जाणकार होते. सुरुवातीचे धृपद गायन बडिलांकडे शिकले. त्यांनी वयाच्या १९ व्या वर्षी जयपूर दरबारची गायकी केली. देवदास चित्रपटातील 'बालम आये बसो मेरे मनमे' व 'दुखके दिन अब बीतत जाय' ही दोन्ही सैगल यांची माइल स्टोन गाणी सहायक असताना खेमचंद यांचीच निर्मिती होती. न्यू थिएटरसोबत मुंबईस आल्यावर स्वतंत्र संगीतकार म्हणून सर्व प्रथम १९३९ साली गाजी सलाउद्दीन' चित्रपटाला संगीत दिले. ९ ऑगस्ट १९५० या दिवशी त्यांचे निधन झाले.

**रमेश पोफळी**

# जॉन अब्राहम मैत्रीला जागला!

हिंदी चित्रपटसृष्टीत अल्पावधीतच यशाच्या शिखरावर पोहोचलेल्या अभिनेत्रींपैकी एक नाव म्हणजे कंगना राणौत.आपल्या करिअरमध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचे चार राष्ट्रीय पुरस्कार जिंकणाऱ्या कंगनाने जवळपास एक दशक गाजवलं. रिव्हॉल्वर रानी, उंगली, कट्टी बट्टी, रंगून, सिमरन, मणिकर्णिका: झाँसी की रानी, जजमेंटल है क्या, पंगा, चंद्रमुखी २ आणि 'तेजस' यांसारख्या चित्रपटांमधून तिने प्रेक्षकांचं मनोरंजन केलं.

कंगना सध्या तिच्या आगामी भारत भाग्य विधाता या चित्रपटामुळे चर्चेत आली आहे. याचनिमित्ताने कंगना राणौतने या चित्रपटासंबंधी एक खास किस्सा शेअर केला आहे. सुरुवातीला चित्रपटाचं वेगळंच टायटल देण्यात आलं होतं. मात्र, जसजशी कथा विस्तार झाला त्यानंतर या टायटलमध्ये बदल करण्यात आला. नुकताच 'भारत भाग्य विधाता' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला आहे. २६/११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याच्या सत्य घटनेवर आधारित हा सिनेमा आहे. आपले प्राण पणाला लावून मुंबईतील कामा हॉस्पिटलमधील धाडसी नर्स आणि कर्मचार्यांनी असंख्य रुग्णांचे प्राण वाचवले होते. या चित्रपटात कंगना राणौत एका नर्सच्या भूमिकेत पाहायला मिळतेय. अलिकडेच या चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्च कार्यक्रमात चित्रपटाच्या टायटल संदर्भात एक महत्वाचा खुलासा केला. तिने म्हटलं, भारत भाग्य विधाता देण्यामागे अभिनेता जॉन अब्राहम यांचा मोठा वाटा आहे. शिवाय कोणताही मोबदला न घेता, त्याने हे सगळं मैत्रीसाठी केलं. या



कार्यक्रमात कंगना म्हणाली, सुरुवातीला या चित्रपटाचं शीर्षक नर्सेस ऑफ कामा असं होतं. मात्र, जसजसं कथानकावर अधिक काम करण्यात आलं, त्यानंतर निर्मात्यांना वाटलं की 'भारत भाग्य विधाता' हे शीर्षक या कथेला अधिक चांगल्या प्रकारे न्याय देऊ शकेल. मग पुढे अभिनेत्रीने सांगितलं, जेव्हा टीमने हे शीर्षक रजिस्टर करण्याचा निर्णय घेतला, तेव्हा त्यांना समजले की ते शीर्षक आधीच जॉन यांच्या नावावर रजिस्टर आहे. त्यानंतर निर्मात्यांनी जॉनशी संपर्क साधला आणि त्याला चित्रपटाचे शीर्षक देण्याची विनंती केली. पण, जॉन अब्राहमने कोणताही विचार न करता अवघ्या एका दिवसात त्यांना या टायटलचे हक्क देऊन टाकले. शिवाय कोणताही अपेक्षा न बाळगता त्याने उदार मनाने हे सगळं केलं. सहसा, असं कोणीही करत नाही. मात्र, जॉनने मोठ्या मनाने हे केलं.त्यासाठी मी त्याची खूप आभारी आहे. दरम्यान, 'भारत भाग्य विधाता' हा चित्रपट येत्या १२ जून २०२६ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटात कंगना राणौतसह अभिनेत्री गिरीजा ओक, स्मिता तांबे, ईशा डे आणि आशा शेलार, सुहिता थट्टे, रसिका आगाशे, आदित्य मिश्रा, जाहिर खान अशा तगड्या कलाकारांची फौज आहे.



# साई पल्लवीचा फेव्हरेट हिरो कोण?

बॉलिवूड दक्षिण चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री साई पल्लवी तिच्या नैसर्गिक सौंदर्य, दमदार अभिनय आणि अप्रतिम नृत्य कौशल्यामुळे प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण करण्यात यशस्वी ठरली आहे. ग्लॅमरच्या आड न जाता केवळ आपल्या अभिनयाच्या जोरावर तिने स्टारडम मिळवले असून देशभरात तिचा मोठा चाहतावर्ग आहे. अलीकडेच एका मुलाखती दरम्यान साई पल्लवीने तिच्या चित्रपट प्रवासाविषयी बोलताना तिच्या आवडत्या अभिनेत्याचाही उल्लेख केला. लहानपणापासूनच चित्रपटांची आवड असलेल्या साई पल्लवीला एका दिग्गज अभिनेत्यामुळे अभिनयाची प्रेरणा मिळाल्याचे तिने आवर्जून सांगितलं. विशेष म्हणजे, तिने ज्या अभिनेत्याचे नाव घेतले ते ऐकून अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. स्वतःपेक्षा वयाने खूप मोठ्या असलेल्या या अभिनेत्याला ती आपला आवडता हिरो मानते, असे सांगत साई पल्लवीने कोणताही संकोच न बाळगता त्या अभिनेत्याविषयीचा आदर आणि प्रेम व्यक्त केले. तिच्या मते, हा अभिनेता केवळ उत्कृष्ट कलाकार नाही तर एक महान व्यक्तिमत्त्वही आहे. त्यांचा चित्रपटातील संघर्ष, यश आणि कारकीर्द अनेक तरुण कलाकारांसाठी प्रेरणादायी असल्याचेही तिने नमूद केले. साईने ज्यांचे नाव घेतले ते म्हणजे दक्षिणेतील मेगास्टार चिरंजीवी. अनेक दशकांपासून चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणाऱ्या चिरंजीवींचा प्रभाव आजही कायम असून ते नव्या पिढीतील कलाकारांसाठी प्रेरणास्थान मानले जातात. अनेकांचे ते आवडते अभिनेते असून साई पल्लवी देखील त्यांची खूप मोठी फॅन आहे. साई पल्लवीच्या चिरंजीवी यांचं नाव घेतल्यानंतर सोशल मीडियावर चाहत्यांमध्ये मोठी चर्चा रंगली आहे. अनेकांनी प्रतिभा ही प्रतिभेलाच ओळखते अशा प्रतिक्रिया देत साई पल्लवीच्या निवडीचे कौतुक केले आहे. अभिनयाला सर्वाधिक महत्त्व देणाऱ्या साई पल्लवीने चिरंजीवी यांना आपला सर्वकालीन आवडता नायक म्हटल्याने चिरंजीवी यांच्या चाहत्यांमध्येही आनंदाचे वातावरण आहे.




# ‘नागबंधम’ चित्रपट येतोय

दक्षिणेत पुन्हा एकदा नवी कहाणी पडद्यावर सादर होणार आहे. मागील काही काळापासून ‘नागबंधम’वरून मोठी चर्चा सुरू आहे. आता या चित्रपटाचे पोस्टर शेअर करण्यात आले आहे. तसेच याचा टीझर प्रदर्शित करण्यात आल्याने प्रेक्षकांची उत्सुकता वाढली आहे. या चित्रपटाच्या पोस्टरमधील सर्व कलाकारांच्या भूमिका दिसून येत आहेत. या पोस्टरमध्ये विराट कर्ण, ऋषभ साहनी, नाभा नतेश आणि जगपति बाबू यांच्यासमवेत पूर्ण स्टारकास्ट एकाचवेळी पॉवरफुल फ्रेममध्ये दिसून येत आहे.

या नव्या पोस्टरला पाहून प्रत्येक भूमिकेमागे कुठलेतरी रहस्य आणि दडलेली कहणी असल्याचे जाणवते. ऋषभने यात अब्दालीची भूमिका साकारली असून याकरता त्याने हिंदी आणि तेलगू दोन्ही भाषांमध्ये डबिंग केले आहे. तसेच याकरता त्याला तलवारबजी शिकण्यासोबत ‘पश्तो’ भाषेचे प्रशिक्षण घ्यावे लागले आहे. या चित्रपटाच्या गाण्यांना श्रोत्यांकडून मोठा प्रतिसाद मिळाला आहे. ‘नमो रे’ गाण्याने युट्यूबवर १० दशलक्ष व्ह्यूजचा आकडा ओलांडला आहे. आता या चित्रपटाच्या प्रदर्शनाची प्रेक्षक आतुरतेने प्रतीक्षा पाहत आहेत. हा चित्रपट देशभरात एकाचवेळी अनेक भाषांमध्ये प्रदर्शित केला जाणार आहे.

# ‘काला हिरण’मधून ‘या’ अभिनेत्याची एक्झिट



अभिनेता सलमान खानच्या जीवनावर आधारित कथित ‘काला हिरण’ चित्रपटावरून वाद निर्माण झाला आहे. हा चित्रपट १९९८ मधील काळवीट शिकार प्रकरणाच्या वादावर आधारित असल्याचा दावा केला जात आहे. सलमानने ‘काला हिरण’ चित्रपटाच्या निर्मात्यांना कायदेशीर नोटीस पाठविल्याने चित्रपट वादाच्या भोवऱ्यामध्ये अडकला आहे. सलमान खानने आक्षेप घेतल्यानंतर अनेक कलाकारांनी त्यातून माघार घेण्यास सुरुवात केली आहे. ‘वॉन्टेड’ चित्रपटात सलमानसह काम केलेले ज्येष्ठ अभिनेते गोविंद नामदेव यांनीही चित्रपट सोडल्याचा निर्णय जाहीर केला आहे.

निर्मात्यांनी दिशाभूल केल्याचा आरोप करीत सलमान खानची बदनामी करणाऱ्या चित्रपटात काम करणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अभिनेते गोविंद नामदेव यांनी ‘वॉन्टेड’ चित्रपटामध्ये पोलीस कमिशनरची भूमिका साकारली होती. त्यांनी आता ‘काला हिरण’ चित्रपट सोडला आहे. याआधी सलमान खानसोबत काम केलेल्या आणखी एका अभिनेत्याने ‘काला हिरण’ चित्रपट सोडून दिला होता. विशेष म्हणजे या कलाकाराने दोन दिवसांचे शूटिंगदेखील केले होते. अभिनेता सोनू मिश्रा याने मागील वर्षी ‘सिकंदर’ या चित्रपटात सलमानसह काम केले होते. सोनू मिश्रा हा ‘काला हिरण’ या चित्रपटामध्ये सलमानची प्रमुख भूमिका साकारत असल्याचे सांगितले जात होते. मात्र, वाद लक्षात आल्यानंतर सोनूने हा चित्रपट सोडण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे सलमनासह काम केलेले कलाकार हे काला हिरण या चित्रपटातून माघार घेत आहेत. एका मुलाखतीमध्ये सोनू मिश्रा म्हणाला, या चित्रपटासाठी खूप उत्सुक होतो. कारण- सुपरस्टार सलमान खान यांच्यावर आधारित भूमिका साकारण्याची संधी मिळाली होती. मी चित्रपटाचे शूटिंगही सुरू केले होते. मात्र, हळूहळू चित्रपटाचा हेतू काय आहे, हे माझ्या लक्षात येऊ लागले. गेली १५-१६ वर्षे अभिनय क्षेत्रात काम करीत असल्यामुळे अशा प्रकारच्या चित्रपटाचा भाग व्हायला मला आवडले नसते. निर्मात्यांचा स्वतःचा दृष्टिकोन असू शकतो; पण जर एखाद्या चित्रपटात सलमान यांना नकारात्मक पद्धतीने दाखवले जात असेल, तर त्या चित्रपटात काम करण्यापेक्षा मी इतर प्रकल्पांमध्ये काम करण्यास प्राधान्य देईन. सोनूने पुढे स्पष्ट केले की, त्यानं ‘काला हिरण’चे दोन दिवस शूटिंग केले होते. मात्र, अधिकृत करार करण्यापूर्वीच चित्रपटातून बाहेर पडण्याचा त्यानं निर्णय घेतला. तो म्हणाला, दोन दिवसांच्या शूटिंगनंतर निर्मात्यांकडे चित्रपटाची स्क्रिप्ट मागितली. मुख्य अभिनेता म्हणून कथा आणि करारातील अटी जाणून घ्यायच्या होत्या. बराच वेळ टाळाटाळ केल्यानंतर त्यांनी मला करार दाखवला. त्यामध्ये माध्यमांसमोर सलमान यांच्याविरोधात बोलण्याची अटही होती. या गोष्टी माझ्या तत्त्वांशी जुळणाऱ्या नव्हत्या. त्यामुळे मी या प्रकल्पापासून दूर राहण्याचा निर्णय घेतल्याचे सोनू मिश्राने स्पष्टपणे सांगितले.

# शाहिद कपूरने घेतला महत्त्वपूर्ण निर्णय

बॉलीवूड अभिनेता शाहिद कपूर हा त्याच्या आगामी 'कॉकटेल २' चित्रपटाचे जोरदार प्रमोशन करत आहे. या चित्रपटामध्ये तो अभिनेत्री क्रिती सेनॉन व रश्मिका मंदाना यांच्यासह झळकणार आहे. शाहिद कपूर हा बॉलीवूडमध्ये वर्षानुवर्षे काम करीत असून, त्याने अनेक सुपरहिट चित्रपट दिले आहेत. मात्र मागील वर्षांमध्ये शाहिद कपूरचे चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट होऊ शकले नाहीत. चित्रपट फ्लॉप होत असल्यामुळे शाहिदने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असल्याचे सांगितले. काही दिवसांपासून शाहिद याचे काही चित्रपट फ्लॉप ठरले आहेत. त्याचे 'देवा' व 'ओ रोमिओ' या दोन्ही चित्रपटांची प्रदर्शनाआधी बरीच चर्चा रंगली होती; मात्र बॉक्स ऑफिसवर अपेक्षित यश मिळाले नाही. या अनुभवातून आपण एक महत्त्वाची गोष्ट शिकलो असून, आता चित्रपटांची निवड करताना वेगळा विचार करीत असल्याचे शाहिदने सांगितले. एका मुलाखतीत शाहिद कपूर म्हणाला की, चित्रपटांना अपेक्षित यश न मिळाल्यामुळे स्क्रिप्ट निवडण्याची पद्धत बदलली आहे. आता चित्रपटाची कथा किंवा नॅरेशन एकट्याने ऐकत नाही, तर माझ्या टीममधील काही लोकांनाही बरोबर घेऊन जातो, असा खुलासा शाहिद कपूरने केला आहे. पुढे शाहिद कपूर म्हणाला, मी माझ्या टीमला आता एक गोष्ट स्पष्टपणे सांगितली आहे. कदाचित चित्रपटाची स्क्रिप्ट निवडण्याचा निर्णय मी एकट्याने घेऊ नये. कॅमेऱ्यासमोर काय करायचे हे मला चांगले माहीत आहे; पण कोणता चित्रपट निवडायचा याबाबत मी नेहमीच योग्य असेन, असे नाही. त्यामुळे आता मी नॅरेशन एकट्याने ऐकण्याऐवजी खोलीत आणखी तीन-चार जण असावेत, यावर भर देतो. त्यामुळे एखाद्या कथेचा विचार फक्त माझ्या दृष्टिकोनातून होणार नाही, असे स्पष्ट मत शाहिदने मांडले आहे. स्वतःच्याच अलीकडील काही चित्रपटांच्या अपयशाबद्दल बोलताना शाहिद म्हणाला की, अभिनेता म्हणून आपण जे काम करतो, त्यावरही आपले पूर्ण नियंत्रण नसते. एखादा सीन कसा दिसेल, फ्रेम कशी असेल हे दिग्दर्शक ठरवतो आणि त्यालाही त्या कामाबद्दल सम ाधान वाटणे महत्त्वाचे असते, असे मत अभिनेता शाहिद कपूरने व्यक्त केले आहे. अभिनेता शाहिद कपूरने २०२५ साली 'देवा' चित्रपटाम ध्ये काम केले होते. मात्र, हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला नाही. 'देवा' चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुमार कामगिरी करणारा ठरला. त्यानंतर २०२६ च्या सुरुवातीला शाहिद कपूरचा 'ओ रोमिओ' चित्रपट प्रदर्शित झाला होता. सोशल मीडियावर या चित्रपटाची जोरदार चर्चा रंगली होती. तरुण वर्गामध्ये या चित्रपटाची उत्सुकता दिसून आली होती; मात्र प्रत्यक्षात हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर जास्त कमाई करू शकला नाही.





# श्रद्धाचा 'ईथा' येणार लवकरच भेटीला

श्रद्धा कपूरला यापूर्वी 'स्त्री २ : सरकटे का आतंक या चित्रपटात पाहिले गेले होते. श्रद्धाचा आगामी चित्रपट 'ईथाची प्रेक्षक आतुरतेने प्रतीक्षा करत आहेत. निर्मात्यांनी आता हा चित्रपट चालू वर्षीच प्रदर्शित होणार असल्याची घोषणा केली आहे. निर्माते दिनेश विजान आणि दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर हे या चित्रपटासाठी एकत्र आले आहेत. या चित्रपटात श्रद्धा दमदार आणि महत्त्वाच्या भूमिकेत दिसून येणार आहे. चित्रपटात श्रद्धासोबत रणदीप हुडा आणि मोहम्मद जीशान अय्यूब देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसून येणार आहे. रणदीप यात मुख्य नायक अन् रोमँटिक भूमिकेत असेल. तर श्रद्धा ही प्रसिद्ध कलाकार विठाबाई यांची व्यक्तिरेखा साकारत आहे. हा चित्रपट २८ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणार आहे. 'ईथा हा चित्रपट महाराष्ट्रातील प्रसिद्ध तमाशा अन् लावणी कलाकार विठाबाई नारायणगावकर यांच्या जीवनावर आधारित आहे. याची कहाणी १९४० पासून १९९० च्या दशकापर्यंत फैलावलेली असेल, ज्यात त्या प्रसिद्ध होण्यापर्यंतचा प्रवास आणि त्यांचा संघर्ष दाखविण्यात येणार आहे. विठाबाई यांनी कमी वयातच स्वत:ची कारकीर्द सुरू केली होती. विठाबाईंना मंचावरील स्वत:ची जबरदस्त उपस्थिती, भावपूर्ण आवाज आणि उत्साही नृत्यासाठी ओळखले जायचे. भारतीय लोकसंस्कृतीत योगदानासाठी विठाबाई यांना १९५७ आणि १९९० मध्ये राष्ट्रपती पुरस्काराने गौरविण्यात आले होते.



# शबाना साकारणार खलनायिकेची भूमिका

इमरान हाश्मी आणि दिशा पटानी यांच्या बहुप्रतिक्षित 'आवारापन २' या चित्रपटाची चर्चा आहे. २००७ मधील कल्ट क्लासिक चित्रपट 'आवारापन'चा हा सिक्वेल आहे. निर्माता विशेष भट यांनी चाहत्यांसोबत एक आनंदाची बातमी शेअर केली. या चित्रपटात शबाना आझमी 'नफिसा' नावाच्या पात्रात दिसणार असून, त्यांच्या संपूर्ण चित्रपट कारकिर्दीतील ही पहिलीच खलनायिकेची भूमिका असेल. सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका फोटोमध्ये विशेष भट शबाना आझमी यांना केक भरवताना दिसत आहेत. तसेच, शबानाजी गेल्या वर्षी वाढदिवसाच्या दिवशीच या प्रोजेक्टमध्ये सामील झाल्याचा खुलासाही त्यांनी केला. त्यांच्या येण्याने चित्रपटाच्या स्टार कास्टमध्ये एक मोठी पडली आहे.

अभिनेत्री शबाना आझमी या त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी अधिकृतपणे या चित्रपटाशी जोडल्या गेल्या. विशेष भट यांनी इंस्टाग्रामवर फोटो शेअर करत कॅप्शनमध्ये लिहिले. नफिसाची भूमिका फक्त आणि फक्त शबानाजी करू शकत होत्या. गेल्या वर्षी त्या त्यांच्या वाढदिवसा दिवशी आमच्या घरी आल्या आणि सर्व गोष्टी योग्य ठिकाणी जुळून आल्या. 'आवारापन २' बद्दल सांगायचं तर या चित्रपटाचे दिग्दर्शक नितीन कक्कर आहेत. बिलाल सिद्दिकी यांनी लेखन केलं असून विशेष भट यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. हा चित्रपट १४ ऑगस्ट रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये रिलीज होणार आहे. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाची थेट टक्कर सनी देओलच्या 'बटावारा १९४७' या चित्रपटाशी होईल.

या चित्रपटात दिशा देखील मुख्य भूमिकेत आहे, मात्र तिच्या भूमिकेबद्दल आणि इमरान हाश्मीसोबतच्या तिच्या केमिस्ट्रीबद्दल मेकर्सनी कोणतीही माहिती जाहीर केलेली नाही. मूळ 'आवारापन' चित्रपट २००७ मध्ये रिलीज झाला होता, ज्यामध्ये इमरान हाश्मीसोबत श्रिया सरन, आशुतोष राणा आणि मृणालिनी शर्मा यांच्या महत्त्वाच्या भूमिका होत्या.